# बोगद्याचे काम ८३ टक्के पूर्ण

## लॉकडाउन काळातील कामांमुळे मेट्रो-३ला वेग

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

लॉकडाउनच्या काळातही कामाला ब्रेक न लागता सुरू असलेल्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ अर्थात मेट्रो-३ या भुयारी मेट्रो मार्गाच्या बोगद्यांचे जवळपास ८३ टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गातील एकूण ३२ बोगद्यांपैकी २८ बोगद्यांचे काम पूर्ण झाले असून एकूण प्रकल्पाच्या ५६ टक्के काम पूर्ण झाले आहे. कामाचा वेग पाहता २०२२ सालापर्यंत मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो धावेल, असा विश्वास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने व्यक्त केला आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या परिसरातून धावणाऱ्या मेट्रो-३ मार्गाचे काम वेगात सुरू आहे. एकूण प्रकल्पाच्या ५६ टक्के काम पूर्ण झाल्याचे कळते. मेट्रो-३ ही मार्गिका देशातील सर्वाधिक लांबीचा



संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग आहे. त्यामुळे हा बहुचर्चित प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी एमएमआरसीने कंबर कसली आहे. या मार्गावरील २५ स्थानकांपैकी १४ स्थानकांतील ५० टक्क्याहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये एमआयडीसी स्थानक (७१ टक्के), मरोळनाका (६७ टक्के), विधानभवन (६५ टक्के), तर सिप्झ (५८ टक्के) या प्रमुख स्थानकांचा समावेश आहे. लवकरच या मार्गावर रूळ बसवण्यास सुरुवात करण्यात येणार असून या कामाची जबाबदारी लार्सन अँड टुब्रो लिमिटेडकडे आहे.

### २०२२चे लक्ष्य

ही मेट्रो २०२२पर्यंत सुरू करण्यासाठी एमएमआरसीएल प्रयत्नशील आहे. सिप्झ ते बीकेसी आणि बीकेसी ते कुलाबा अशा दोन टप्प्यांमध्ये हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे. भुयारीकरण, रूळ बसविणे, डब्यांची बांधणी, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन ही कामे एकाचवेळी सुरू आहेत.

### मिठी नदीवर पूल

एमएमआरडीएच्या अखत्यारीत सुरू असलेल्या डी. एन. नगर ते मंडाळे (मेट्रो-२बी) मार्गावर धावणाऱ्या मेट्रोला मिठी नदीसह वाकोला नाला पार करावा लागणार आहे. यासाठी दोन्ही ठिकाणी पूल उभारण्याचे काम लवकरच हाती घेतले जाणार असून यासाठी निविदा जारी करण्यात आल्या आहेत. या दोन्ही पुलांसाठी १८० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. हा प्रकल्प जोडणीच्या दृष्टीने घाटकोपर-अंधेरी (मेट्रो १), कुलाबा -वांद्रे-सिप्झ (मेट्रो ३), मोनोरेल (चेंबूर), पूर्व द्रुतगती महामार्ग (मेट्रो ४) या प्रकल्पांना जोडला जाणार आहे. डी. एन. नगर ते मंडाळे (मेट्रो-२बी) या २३.६४ किमी उन्नत मार्गावर मिठी नदीवर १२० मीटर, वाकोला नाला येथे ८० मीटर आणि बीकेसीजवळ ७३ मीटर लांबीचे पूल उभारण्यात येणार आहेत. यापूर्वीच मेट्रो-३ प्रकल्पासाठी मिठी नदीच्या खालून भुयारीकरणाचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण करून एमएमआरसीएलने मैलाचा दगड गाठला आहे. या उभारणीच्या कामासाठी इच्छुक कंत्राटदारांनी २८ जुलैपर्यंत अर्ज दाखल करायचे आहेत.